जावक क्र. 11276 /2025
करवीर पोलीस ठाणे, कोल्हापूर
दि. 30 / 9 /2025

प्रति

मा. श्री. वाकचौरे सो ---------------- कोर्टसो ~~कोल्हापूर~~ तासगाव, सांगली यांना सविनय सादर

प्रतिवेदक -पोकॉ-१४०९ एस.एस.पाटील,नेमणुक -करवीर पो.ठाणे यांज कडुन वि.पु.की,

विषय - समन्स / नोटीस बजावणीबाबत .......

महोदय,

आपले न्यायलयाकडील स / रे.क्रि.के.नं. 192/2024 मधील ~~साक्षीदार~~ / आरोपी / वि.प.इसम नामे शिवाजी विलास पाटील

यांना मुदतीत बजावणी केली आहे / ~~नाही~~. तरी पुढील आदेश होणेस विनंती आहे.

मार्फत
पो.नि.सो करवीर पो.ठाणे
मा सविनय सादर

दिवाणी न्यायालय क.स्तर, तासगाव
आवक क्र. 3063
दिनांक 9/10/25 सहा. अधिक्षक

पो.कॉ. १४०९ पाटील
करवीर पोलीस ठाणे, कोल्हापूर

मा. वाळवेकर सो कोर्ट, तासगांव

नमुना क्रमांक १, अनुसूची २

**आरोपीस समन्स.**

फौ. व्य.सं. ४ म.
सं.क्रि.के.नं. - १९२/२०२४.
नेमली तारीख - १३/१०/२०२५.

तक्रारदाराचे नांव - चंद्रकुमार विश्वास माने.

प्रति,
पोलिस निरिक्षक करवीर पोलिस ठाणे जि.कोल्हापूर.

आरोपीचे नांव – १.शिवाजी विलास पाटील.

राहणार – कैरले-कोतोली मेन रोड, मंगल कार्यालयाजवळ, कैरले ता. करवीर जि. कोल्हापूर.

ज्याअर्थी, परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ खालीलच दोषारोपास उत्तर देण्यासाठी आपली उपस्थिती आवश्यक आहे. (तक्रारीची प्रत यासोबत जोडलेली आहे.)

आपण व्यक्तिशः दिनांक - १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कुळकर्णी सो कोर्ट, तासगांव समोर उपस्थित राहणे आवश्यक आहे यात कसूर होऊ नये.

अधिक निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढीलप्रमाणे आहेत.

अ. तुम्हास असे स्पष्ट करण्यात येत आहे की, खटल्याच्या पहिल्या किंवा दुस-या दिवशी तुम्ही तडजोड करण्यासाठी अर्ज करू शकता आणि जर असा अर्ज करण्यात आल्यास, तुमच्यावर कोणताही खर्च न लादता न्यायालय तडजोडीस मान्यता देऊ शकते.

ब. जर आपण वरीलप्रमाणे तडजोडीसाठी अर्ज केला नाही आणि जर असा तडजोडीचा अर्ज दंडाधिकारी यांच्यासमोर सुनावणीच्या पहिल्या किंवा दुस-या तारखेनंतर केल्यास, तुम्हाला धनादेशावरील रकमेच्या १० टक्के रकम खर्च म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे अथवा न्यायालयास योग्य वाटेल अशा प्राधिकरणात जमा करण्याच्या अटीवर कोर्ट तडजोड करण्यास परवानगी देवू शकते.

क. तसेच, तर तडजोडीचा अर्ज सत्र न्यायालय वा उच्च न्यायालयासमोर पुनरीक्षण अथवा अपील यामध्ये केला असेल, तर तुम्हाला धनादेशावरील रकमेच्या १५ टक्के रक्कम खर्च म्हणून भरण्याच्या अटीवर तडजोडीला मान्यता देण्यात येऊ शकेल.

ड. अंतिमतः जर तडजोडीसाठीचा अर्ज मा. सर्वोच्च न्यायालयासमोर केला असेल, तर हा आकडा धनादेश रकमेच्या २० टक्के इतका वाढेल.

याप्रमाणे वरील मार्गदर्शक तत्वासे अनुसरुन लादलेला खर्च ज्या न्यायालयासमोर तडजोडकरण्यात येते अशा न्यायालय पातळीवर काम करण्याऱ्या विधी सेवा प्राधिकरणात खर्च म्हणून भरावा लागेल उदाहरणार्थ, जेव्हा दंडाधिकारी यांच्या न्यायालयासमोर वा सत्र न्यायालयासमोर खटला प्रलंबित असेल, तेव्हा अशा तडजोड प्रकरणी खर्च जिल्हा विधी सेवा प्राधिकरणात जमा करावा लागेल त्याचप्रमाणे उच्च न्यायालयासमोरील तडजोडीच्या संबंधात लादलेला खर्च राज्य विधी सेवा प्राधिकरणात भरावा लागेल, आणि मा. सर्वोच्च न्यायालयासमोरील तडजोडीच्या संबंधात लादलेला खर्च राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणात भरावा लागेल.

आज दिनांक ११/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने आणि कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले

आदेशावरुन
(सही)
सहा अधिक्षक,
फौजदारी न्यायालय तासगांव

पोलीस निरीक्षक
करवीर पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर
१४ AUG 2025
आवक २५५५/२५
१२/८/२५

शरदसिंग घाटगे
4158160767